सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय पुणे ( आपत्ती व्यवस्थापन शाखा )

दुरध्वनी क्र.०२०-२६१२३३७१ E-mail-homebranchpune@ gmail.com

---

**वाचा:**-१ आपती् व्यवस्थापन अधिनियम २००५
२. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ४३
३. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७

---

क्र.जि.आ.व्य/कावि/४५/२०२०
पुणे, दिनांक १९ /३/२०२०

**विषयः- कोरोना विषाणुच्या साथीमुळे उदभवलेल्या परिस्थितीमुळे पुणे जिल्हयातील सर्व आधार केंद्र बंद ठेवणेबाबत.**

**आदेश**

उपरोक्त विषयाचे अनुषुंगाने कळविण्यात येते की, जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणूला (COVID-१९) जगभरात पसरलेला साथीचा आजार म्हणून घोषित केलेला आहे.आंतरराष्ट्रीय स्तरावरुन पुणे शहरामध्ये व परिसरामध्ये परदेशातून आलेले देशी विदेशी नागरीक, पर्यटक यामुळे सदर विषाणुचा प्रार्दुभाव पसरण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

सदरच्या कोरोना विषाणूपासून संसर्ग फैलावण्याची शक्यता आहे. उपरोक्त परिस्थती विचारात घेऊन सदर विषाणूचा व रोगाचा फैलाव रोखण्यासाठी व अनावश्यक गर्दी टाळण्यासाठी पुणे जिल्हयातील सर्व आधार केंद्र पुढील आदेश होईपर्यत बंद ठेवणेत येत आहे.

जिल्हाधिकारी पुणे

( नवल किशोर राम )
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**

**प्रति,**

१. जिल्हा नोडल अधिकारी, आधार प्रकल्प, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे
२. तहसिलदार, संजय गांधी योजना, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे
३. नोडल अधिकारी, आधार प्रकल्प पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे
४. सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार व गट विकास अधिकारी जि. पुणे
५. अग्रणीय बँक प्रबंधक, बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे
६. महाप्रबंधक (व्यवसाय विस्तार समूह), पोस्ट ऑफिस पुणे विभाग, पुणे
७. जिल्हा समन्वयक, आधार प्रकल्प, महाऑनलाईन पुणे
८. जिल्हा समन्वयक, आधार प्रकल्प, महाआयटी पुणे
९. ------------- आधार केंद्र चालक, पुणे

**प्रतः-** १. मा. विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर
२. मा. सचिव मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर
३. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.

Scanned with CamScanner